
2021-22

# २००० नंतरचे साहित्य प्रवाह
## स्वरूप आणि आकलन



संपादक | सहसंपादक
डॉ. मारोती कसाब | डॉ. अनिल मुंढे

# "आदिवासी साहित्यातील स्त्री"

## प्रा. डॉ. सी. एस. आवारे

मराठी पदवी व पदव्यूत्तर विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता. जि. बीड.

**प्रस्तावना**

मराठीच्या साहित्य क्षेत्रात आज अनेक नवनवीन साहित्य प्रवाह उदयाला येत आहेत. हे प्रवाह आपल्या वेगवेगळ्या स्वरुप-वैशिष्ट्यासह समृद्ध व गतिमान होवू लागले आहेत. मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, प्रोदशिक साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, बालसाहित्य व आदिवासी साहित्य असे विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले आहेत. कोणताही वाङ्मय प्रकार हा अचानक उदयाला येत नाही, तर तो एखाद्या कलाकृतीत येण्यासाठी जी जाणिव निर्माण होत असते तेव्हाच तो उदयाला येत असतो. त्यापैकी आदिवासी साहित्य हा साहित्याचा प्रकार देखील अलिकडच्या काळात उगम पावताना व विस्तारताना दिसून येत आहे. या वाङ्मय प्रकारात देखील कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन इत्यादी साहित्य प्रकार निर्माण होत असल्याचे पहावयास मिळते. हजारो वर्षापासून आदिवासींनी जे जीवन जगले आहे, जे भोगले आहे, त्या व्यथा तो कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र यातून व्यक्त करताना दिसून येतो. अज्ञान, अंधश्रद्धा, लाचारी, दारिद्र्य इत्यादीमुळे संवेदनाहीन झालेला आदिवासी समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या प्रेरणेतून आणि जाणिवेतून दलित तसेच आदिवासी साहित्याची निर्मिती झालेली दिसून येते. या आदिवासी साहित्याने महाराष्ट्राच्या समाज जीवनावर फार मोठा प्रभाव टाकलेला पहावयास मिळतो.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत येथील वर्णव्यवस्थेने, समाज व्यवस्थेने दलितांना गावकुसाबाहेरील जीवन जगायला भाग पाडलेले होते. त्यांच्यावर अनेक बंधने घालून त्यांचा सर्वांगिण विकास थांबवण्यात आला होता, तर आदिवासींना या भूमीचे मूळ मालक, रहिवासी असूनही आर्यांनी त्यांना गावकुसाबाहेर दूर हाकलून लावले. त्यामुळे जमिनीचा मूळ मालक असलेला आदिवासी बेघर होवून डोंगरदऱ्या मध्ये राहून आपले आयुष्य आजही व्यतीत करताना दिसून येत आहे. या संदर्भात सौ.कुसूम नारगोळकर आपले मत व्यक्त करताना म्हणतात, "अस्पृश्यांना हिंदू

समाजाने शूद्रसेवक म्हणून का होईना, परंतू एक विशिष्ट सामाजिक स्थान दिले होते. परंतु आदिवासींना मात्र श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असे कोणतेच स्थान दिलेले नव्हते, ते उपेक्षित होते. ती आपणा सारखीच माणसे आहेत ही जाणिव आतापर्यंत निर्माण झाली नव्हती. रामायण आणि महाभारतासारख्या ग्रंथातून तर दैत्य, पिशाच्च, राक्षस, असूर असेच आदिवासींना संबोधले गेले आहे. आर्यांच्या आगमनानंतर त्यांनी अनार्यावर केलेले आक्रमण, हल्ले, क्रूर संहार आणि त्यानंतर दीर्घकाळ चाललेला सांस्कृतिक संघर्ष यात आदिवासींची पिछेहाट होवून, त्यांनी घेतलेल्या डोंगरदऱ्या आणि वने यांचा आश्रय यामुळे त्यांचा संबंध गावापासून कायमचा तुटला. टोळ्या टोळयांनी विस्थापित आणि विपण्ण अवस्थेत जगणे त्यांच्या नशिबी आले."

आदिवासी म्हणजे कोण? आदिवासींच्या व्याख्या विविध अभ्यासकांनी केलेल्या आहेत.

१. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी - नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होत.
२. प्रा. वामन शेळमाके - आदिवासी म्हणजे भूतलावर पहिले पाऊल ठेवणारा माणूस, नागरी संस्कृतीपासून अगदी दूर, जंगल खोऱ्यात, दुर्गम दऱ्याखोऱ्यात राहणारा व स्वतःचे अस्तित्त्व जपणारा माणूस म्हणजे आदिवासी. आदिवासी म्हणजे दु:खाची समस्त महागाथा.
३. डॉ. गोविंद गारे - भौगोलिकदृष्ट्या इतरापासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकंदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा, निर्सगाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी.

अशा आदिवासींच्या विविध व्याख्या अभ्यासकांनी केलेल्या दिसून येतात. या सर्व व्याख्यांमधून आदिवासी किती हालाकीचे व कष्टमय जीवन जगत असेल याची प्रचिती येते. या आदिवासीवर अलिकडच्या काळात जागतिकीकरणाने हल्ला केल्यामुळे तर आदिवासींचे अस्तित्त्व पार धुळीला मिळालेले पहावयास मिळते.

आदिवासी साहित्याची निर्मिती ही मर्यादित स्वरुपाची असल्यामुळे आणि आदिवासी समाज वेगवेगळ्या समूह गटात विभागल्यामुळे प्रत्येक जमातीची आपली स्वतंत्र बोलीभाषा असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये अकोला, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, बुलढाणा, भंडारा, यवतमाळ, ठाणे, धुळे, नंदूरबार आणि नाशिक या जिल्ह्यात काही भागात आदिवासी जमाती या वास्तव्य करुन राहत आहेत. त्यामध्ये गोंड, कोटकू,

बंजारा, महादेवकोळी, ठाकूर, भिल्ल, राजगोंडे, परधान, हलबा, कँवर, कोलाम, पावरा, तडवी, लमाणी, कातकरी, कोकणा, मल्हारकोळी, धोंडीया, गावीत, दुबळा, आंध कातकोळी अशा जमातींचा समावेश आहे. आदिवासी समाज हा प्रामुख्याने डोंगरदऱ्यात राहणारा असल्यामुळे जंगलात हिंडणे, शिकार करणे, फळे, कंदमुळे, मध गोळा करणे, औषधी गोळा करणे हीच त्यांची कामे दिसून येतात. आदिवासी व निसर्ग यांचे अगदी अतूट नाते आहे. आदिवासी स्त्री निसर्गालाच सखा व बंधू मानते. आज आदिवासी हा निसर्ग बदलाशी जुळवून घेत गुजराण करतो आहे आणि जागतिकीकरणाच्या प्रचंड मोठ्या प्रक्रियेचा भाग बनताना दिसतो आहे. आज त्यांच्या गावापर्यंत रस्ते, वीज व शाळा पोहचल्या आहेत. पण या बदलाने आदिवासी स्त्रीचा दर्जा फारसा उंचावलेला दिसत नाही.

आदिवासी समाजाचा इतिहास प्राचीन आहे. संस्कृती पुढे चालवून ती संस्कारीत करण्याचे काम आदिवासी स्त्रीच करीत आली आहे. विविध प्रकारची दैनंदिन कामे आदिवासी स्त्रीच पार पाडताना दिसून येते. पुरुषापेक्षा ती अधिक कामे करताना दिसते. सामाजिक व धार्मिक कामात आदिवासी स्त्री पुरुषाच्या बरोबरीने सहभागी होते. आदिवासी समाजात मुलगा व मुलगी यांना समान दर्जा आहे. मुलीच्या लग्नात मुलाकडून व वधुतल्य देण्याची प्रथा आहे. जोडीदार निवडण्याचे स्त्रीला स्वतंत्र्य आहे. ती नराची निवड करताना त्याची पूर्ण क्षमता प्रथम अजमावते. तिला जर तो चपळ दिसला नाही, तो कड्याकपाऱ्यातून आणि अवघड झाडावरुन सहज उड्या मारण्यात कुठे थोडा जरी कमी पडला तरी ती चुटकीसरशी त्या नराला बाजूला सारते आणि योग्य असलेल्या नराचीच आपला जोडीदार म्हणून निवड करते, यालाच 'गोटूल' म्हणतात. आदिवासी संस्कृतीत गोटूल केंद्रस्थानी असून जोडीदाराची सर्वार्थाने ओळख पटवूनच जीवनसख्यांची निवड प्रक्रिया पूर्ण होते. गोटूल प्रक्रियेतून अंतिम निवड होईपर्यंत दर तीन दिवसांनी तिला जोडीदार बदलावा लागतो, असा अलिखीत नियम आहे. म्हणजेच तिला घटस्फोटाचा ही अधिकार आहे. विधवा स्त्रीला पतीच्या मालमत्तेत वाटा मिळतो. विधवेचा पुनर्विवाह ही होतो.

आदिवासी स्त्री पतीस देव मानत नाही. शेतीची सर्व कामे आदिवासी स्त्रिया करतात. ही स्त्री आपल्या आरोग्याकडे पूर्ण दुर्लक्ष करताना दिसते. त्यामुळे तिची मुले कुपोषणाला बळी पडताना दिसतात. आदिवासी स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे. आदिवासी स्त्री दारु व तंबाखूचे सेवन

करते. आदिवासी स्त्री तोकड्या कपड्यातील देह प्रदर्शन करणारी नाही तर ती स्वच्छंदी वृत्तीची, आपल्या परंपरेचे पालन करणारी, सतत शेतीत कष्ट करुन निसर्गाशी समरस होणारी आणि आपला संसार पैलतीरावरती नेणारी आहे. आदिवासी स्त्री परंपरेतून स्वत:चे स्वातंत्र्य सूचित करणारी दिसून येते.

आदिवासी स्त्री आणि जंगलाचा विचार सुरु झाल्यास आपल्या लक्षात येते की, आदिवासी स्त्री ही स्वाभिमानी, स्वयंशासित, कौटुंबिक राज्यकारभार करणारी राजमाता असल्याने ती स्वत:चे निर्णय स्वत: घेते. तिच्यावर उपासमारीची वेळ आली तरी ती खंबीरपणे पावले उचलते व परिस्थितीला बेधडक सामोरी जाते. मात्र भीक मागण्याचा अथवा वेश्यागमनाचा मार्ग ती कधीही स्विकारत नाही. या मागील प्रमुख शक्ती निसर्ग देवतेची असल्याचे आपल्या लक्षात येईल. निसर्ग आणि आदिवासी यांचा अनोखा संगम आपणास खालील वारली गीतावरुन लक्षात येईल.

"बामणाच्या जन्माला जाशी, त लिखून लिखून मरशी,
मारवाडी होशी... त तोलून तोलून मरशी,
चमार होशी... त नाड्या जोती करुन मरशी,
पन वारल्याच्या जन्माला जाशी... त जंगलचा राजा होशील रं बाबा"

वारली जमातीच्या या गीतातून ती वारली माय आपल्या तान्ह्या बाळाला जो काही सबुरीचा आणि शहाणपणाचा सल्ला देत आहे, त्यातच आदिवासी संस्कृतीची मूल्ये रुजलेली आहेत.

प्रारंभापासूनच आदिवासी स्त्रियांचे झाडासोबत एक सलोख्याचे आणि मैत्रीचे नाते निर्माण झालेले पहावयास मिळते. त्याचे कारण म्हणजे कोणतेही काम करताना ती तान्हुल्याला मोठ्या विश्वासाने झाडाला बांधलेल्या झोळीत निजवते आणि बिनधास्तपणे शेतीतील कामे पार पाडते. तिचे बाळ त्या झोळीत निवांत झोप घेते व जरी जागे झाले तरी झाडांच्या सळसळणाऱ्या पानाकडे बघून टाळया वाजवत आनंदाने खेळत राहते. त्यामुळे बाळाच्या आईच्या कामात कुठेही अडथळा येत नाही. एवढे करुनही तिच्यावर एखादे संकट आले तर ती झाडाच्या सोबतीनेच सुख-दु:खाची वाटणी करताना दिसून येते. एकंदरीत आदिवासी स्त्रीने झाडालाच सखा आणि बंधूरायाही म्हटलेले आहे. तिने स्वत: नेहमीच वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगल्याने विविध वनऔषधीचे गुणधर्म ताडून बघितले आहेत. त्यातूनच झाडांच्या किती तरी कहाण्या अजरामर झाल्या आहेत.

गर्भपात करण्यासाठी वापरात येणाऱ्या भूमिकेत जाऊन ती स्वत:वरच काही प्रयोगही करीत आली आहे. अशातूनच तिला काही महत्त्वाचे शोधही लावता आले आहेत. 'टेंभरु' या झाडाचा डिंक गुळात मिसळून त्याच्या गोळ्या बनवून ठराविक वेळेनुसार खायला दिल्यास पुरुषाशी संबंध आला तरी बाईला दिवस जात नाहीत. शिवाय 'येल्या' साप बाईला खायला दिल्यास त्या काळात पुरुषाचा संबंध आला तर लवकर गर्भधारणा राहते, हे आदिवासी स्त्रीने निसर्गाच्या समीप राहून आपल्या फायद्या-तोट्यासाठी लावलेले अत्यंत मौलिक शोध म्हणावे लागतील. आदिवासी स्त्रियांचे औदूंबर, पिंपळ, मोह, जांभूळ, बहावा, हिरडा-बेहडा, साग, पळस, चिंच, बांबू, बाभूळ, वड, पिपर, धायटी, कोरफड, सादडा, धावडा, सायर, भोकर इ. वृक्षांशी अत्यंत पवित्र व भावनिक नाते निर्माण झालेले पहावयास मिळते. मोह वृक्षाला आदिवासी माऊली कल्पवृक्ष मानते. कारण त्याच्या सर्वच भागाचा काही ना काही उपयोग होतो. मोहाच्या फुलापासून फक्त दारुच बनविली जात नाही तर साल, पाने, लाकूड, बियांपासून कितीतरी औषधे बनविली जातात, याचे ज्ञान आदिवासी स्त्रीला आहे.

आदिवासींच्या सर्व वाङ्मय प्रकारावर दृष्टीक्षेप टाकला असता, आदिवासी लेखकांनी सर्व प्रकार हाताळलेले दिसतात. कविता, कथा, नाटक, कादंबरी, आत्मचरित्र या सर्व क्षेत्रात आदिवासींची लेखणी संचार करताना दिसून येते. आदिवासी कवितेवर नजर टाकली असता फार विरळ प्रमाणात काव्य निर्मिती झालेली दिसते. आदिवासी कवींचा पहिला प्रातिनिधीक संग्रह 'मोहोळ' १९८२ साली प्रकाशित झाला. त्यानंतर आदिवासी कविता-भूजंग मेश्राम, वनवासी-उत्तमराव धोंगडे, गोधडं-वाहरु सोनवणे, गोंडवन पेटले आहे-विनायक तुकराम, उलगुलान-भूजंग मेश्राम, इंद्रियारण्य-निलकांत कुलसंगे, वनसूर्य-पुरुषोत्तम शेळमाळके, जागवा मने पेटवा मशाली-वामन शेळमाळके, रानपाखरांची माय, रान आसवांचे तळे-सौ. कुसूम अलाम इत्यादी कविता संग्रहाचा उल्लेख करावा लागतो.

आदिवासी कांदबऱ्यांचा विचार केला असता एक गोष्ट लक्षात येते की, आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कांदबऱ्यापेक्षा बिगर आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कांदबऱ्यांची संख्या अधिक आहे. बिगर आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कांदबऱ्यांच्या लेखनामागे मानवी स्वभाव-कुतूहल असले तरी अनेक बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासीवर होणाऱ्या अन्यायाला, त्यांच्या शोषणाला, पिळवणूकीला, लैंगिक शोषणाला, शेठ-

सावकारांकडून होणाऱ्या त्रासाला व फसवणूकीला कांदबऱ्यांद्वारे वाट मोकळी करुन दिली आहे, हे सत्य नाकारता येत नाही. आदिवासी कादंबरीचा विचार करताना, 'जन्माने आदिवासी असणाऱ्या लेखकांनी लिहिलेली आणि आदिवासींची वैशिष्ट्ये मांडणारी कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी होय', अशी साधी-सोपी व्याख्या करता येईल. मात्र बिगर आदिवासी लेखकांच्या तुलनेत आदिवासी लेखकांच्या कांदबऱ्यांची संख्या अगदी बोटावर मोजण्याइतकी आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तृष्णा-(१९९५) नजूबाई गावीत, वाडा (१९९६) माधव सरकुंडे, टाहो (१९९८) बाबा मडावी, कोळवाडा/ वाडा (२००४) गोपाळ गवारी, भिवा फरारी-नजूबाई गावीत, आकांत (२००८) बाबाराव मडावी, दैना (२०१२) भास्कर भोसले इत्यादी कांदबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल.

या लेखामध्ये प्रामुख्याने २००० नंतरच्या आदिवासी कविता व कादंबरी यामध्ये आलेले आदिवासी स्त्रीचे चित्रण आलेले आहे. आज जागतिकीकरणाने आदिवासीच्या प्रत्येक क्षेत्रात हल्ला करुन एकंदरीत आदिवासींचे अस्तित्वचं धुळीला मिळविलेले आहे. जागतिकीकरणाने डोंगरदऱ्यामध्ये आपले आयुष्य घालविणाऱ्या आदिवासींना प्रतिबंध केला आहे. त्यामुळे जागतिकीकरणासारख्या नव्या गुलामगिरीशी त्यांना सामना करावा लागत आहे. जागतिकीकरणाने अर्थकारणाला, उद्योजकतेला जरी गती प्राप्त झाली असली तरी सर्वसामान्य आदिवासी समूहाचा या ठिकाणी अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. जमीन, जंगले, पाणी, गाई-गुरे यातच चरितार्थ चालविणाऱ्या आदिवासींना त्यांच्या वस्तीस्थानावरुन हटविल्या जात आहे.

आदिम काळापासून ते आजपर्यंत आदिवासी स्त्रीला समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान आहे. परंतू या जागतिकीकरणासारख्या समस्या निर्माण झाल्याने नव्या गुलाम व्यवस्थेने स्त्रीकडे एक भोगवस्तू म्हणून पाहिले जात आहे. सभ्य संस्कृतीच्या बुरख्या आड असणाऱ्या या भोगवादी समाजातील दलालांनी स्त्रियांचे वस्तूकरण केल्याने त्याविरुद्ध साहित्यातून आवाज उठविण्यात येत आहे. त्या बाबत कुसूम अलाम आपले मत व्यक्त करताना म्हणतात.

"मित्रा ठणकावून सांग त्यांना, जंगलात फिरलो आम्ही अर्धनग्न
कॅमेऱ्यापुढे विवस्त्र झाल्याचं नाहीत मायबहिणी,
आमच्या मुक्त लैंगिकतेवर बोलाल तर खबरदार
विवाहासाठी ब्लड ग्रुप चेकिंगची वेळ, आम्हांवर यायची आहे."

अशा प्रतिक्रया आदिवासी साहित्यातून व्यक्त होत आहेत. धोरणी शासनाने जाणिवपूर्वक सर्व पर्यटन स्थळे आणि अभयारण्य ही आदिवासी वास्तव्यास असलेल्या जंगलातच काढली आहेत. त्यामुळे हौसे-नवसे-गवसे पर्यटक आता पाटऱ्या करायला, मजा मारायला पर्यटन स्थळांचा आधार घेवून आदिवासी वस्तीत येवू पाहतात. त्यांच्या वागण्या-खिंदळल्याने आदिवासी अधिकच त्रस्त बनला आहे. त्यांचे स्वच्छंदी जगणं ही स्वच्छंदी राहिलेले नाही. गरिबीने बेजार झालेल्या या आदिवासी स्त्रियांना फाटक्या जुनेराने आपली इज्जत झाकण्याचेही भान नसते. काही पर्यटक बरोबर हीच संधी साधतात व त्यांचे फोटो नकळत काढतात. ह्याचे भान असलेल्या कवयित्री सौ.कुसूम अलाम आपल्या आदिवासी भगिनींना सावध करताना म्हणतात,

"सखे ! लक्षात घे ! कदाचित झुडपा आडून एकदा कॅमेरा,
तुझ्या असीम सौंदर्याला, 'बेडीबंद' तर करत नाही ना?
नाहीतर प्रत्येक आंबट शौकीनांच्या दिवाणखाण्यात, नग्न होऊन बसशील
पोस्टर रुपात
आणि बघे म्हणतील... वा ! क्या माल है !"

असे अस्सल व वास्तवतेला धरुन लिहिले गेलेले हे आदिवासी साहित्य 'मराठी साहित्याचे वैभव लेणे' व 'मराठी साहित्याची मुहूर्तमेढ' असा या साहित्याचा सगळीकडे गौरव होऊ लागला आहे. परंतू आदिवासी साहित्य हे केवळ मराठी साहित्याचे नव्हे तर विश्व साहित्याचे वैभवलेणे आहे हे विसरुन चालणार नाही. जागतिकीकरणामुळे आदिवासींचे जीवन उद्धवस्त व्हायला सुरवात झाली. जागतिक बाजारपेठांनी त्यांच्या वस्तीस्थानावर आक्रमणे करुन त्यांचा मालकी हक्क संपुष्टात आणला गेला. जंगल हे आदिवासींचे मालकीचे ठिकाण, पण तेच आता नष्ट होत आहे. आधुनिकतेच्या नावाखाली आदिवासी संस्कृतीला विरोध करणाऱ्या लोकांना कुसूम अलाम फटकारताना म्हणतात,

"तुम्ही भडवेगिरी केली,
बलात्कार, छेडछाड केली
कुंटणखाणे चालविले
तरी तुमचे चालते"

अशा पद्धतीने आपल्या संस्कृतीचे समर्थन त्यांनी मांडले आहे. विद्रोहाची भाषा आपल्या कवितेतून मांडली आहे. आदिवासी जमातीला या विरुद्ध लढण्यासाठी तयार केले आहे.

"तुझ्या शोषणासाठी बसलेल्या सर्व चिलटांना
भस्म कर जळजळीत नेत्र कटाक्षाने
तर खऱ्या अर्थाने आनंद पर्व सुरु होईल"

आजही आदिवासी स्त्री जंगल संपत्ती गोळा करताना दिसते. आदिवासी स्त्री प्रचंड गरिबीत जखडलेली आहे. भूकंप, पूर, कोरडा किंवा ओला दुष्काळ यात अडकलेली दिसते. स्वतःच्या गावात रोजी-रोटीचे साधन नसल्यामुळे स्थलांतर करणारी आदिवासी स्त्री दिसून येते. मोठ्या महानगरात कामासाठी गेल्यावर काही व्यापारी, दलाल, अधिकारी, ठेकेदार तिला वाम मार्गाला लावण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे कामाच्या ठिकाणी तिला प्रचंड समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे समाजात व सरकारी दरबारी या कष्ट प्रत जीवन जगणाऱ्या आदिवासी स्त्रियांचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

आदिवासी भागात रस्ते, वीज, एस.टी., रेडिओ, दूरदर्शन, शाळा, महाविद्यालय या सर्व सुविधा पोहचल्यावर त्यांची संस्कृती टिकेल का? अशी चिंता करणारा एक मोठा वर्ग आहे. त्यांनी आदिवासींची चिंता न केलेली बरी. आपल्या देशात विचारांचे देखील प्रदूषण झाले आहे. पण आदिवासी मुलां-मुलींनी खुप शिकावे, त्यांना उत्तम इंग्रजी यावे, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने त्यांच्या हातात हात घालून फिरावे, त्यांनी शिक्षक, प्राध्यापक, इंजिनिअर, डॉक्टर, ऑफिसर व्हावे असे आपणास का बरे वाटत नाही? मात्र आता आदिवासीनींच आपली भूमिका खंबीरपणे अवलंबिली आहे. ते म्हणतात- 'आता किती दिवस आम्हीच जंगलाचे रक्षण करायचे? आम्हीच का मक्ता घेतला आहे? आता ते कदापिही चालणार नाही', डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "दलितांनो, खेडी सोडा आणि शहराकडे चला, त्याशिवाय तुमची प्रगती अशक्य आहे." आज खऱ्या अर्थाने आदिवासींनाही ललकारण्याची वेळ आली आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. कलकते गौळण - अग्निकुंडातील आदिवासी स्त्री- गोदा प्रकाशन, औरंगाबाद - सप्टेंबर २०११ प्रथम आवृत्ती.
२. आदिवासींचे विश्व - डॉ. शैलजा देवगावकर, डॉ. श.गो. देवगावकर
३. डॉ. प्रमोद मुनघाटे - आदिवासी मराठी साहित्य : स्वरुप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन, पुणे-२००७
४. डॉ. विनायक तुमराम - आदिवासी साहित्य : स्वरुप व समस्या - विजय प्रकाशन, नागपूर-१९९४
५. डॉ. गोविंद गारे - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती - कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे-२००२
६. कुसुम अलाम - रानपाखरांची माय - हरीवंश प्रकाशन, चंद्रपूर


***

**Impact Factor-7.675 (SJIF)**

**ISSUE No- (CCCXVIII) 318 (C)**

**ISSN-2278-9308**

**September-2021**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

# Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**

**Editor**
**Dr. Pramod S. Meshram**
**I/c Principal,**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) C
ISSN : 2278-9308
September, 2021


| | | |
|---|---|---|
| 18 | भारतीय संविधान व मानवाधिकार **प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव** | 68 |
| 19 | विवेक शूर वीर समाजसुधाकर डॉ. बी.आर आंबेडकर **डॉ. प्रा. पांडूरंग एकनाथ शिवशरण** | 73 |
| 20 | निवडक मराठी चारोळ्यातून बाबासाहेबांचे दर्शन **डॉ. मदकुंटे पी. एम.** | 76 |
| 21 | अर्थतज्ज्ञ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर **प्रा. पी. बी. खरात** | 79 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरव स्वतंत्र मजूर पक्ष **डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी** | 84 |
| 23 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांची "धम्म" संकल्पना **डॉ मनोहर कुंभारे** | 86 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेशेतीविषयक विचार व कार्य... **प्राध्या. श्रीमती माधवी विजय पांचाळ** | 91 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महिलांसबंधी दृष्टीकोन व कार्य **ज्योती पांडुरंग सोनसळे** | 96 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे राजकीय विचार **प्रा. लुलेश्वर धरमसारे** | 101 |
| 27 | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य **प्रा. डॉ. आवारे सी. एस.** | 103 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलित साहित्य आणि संत साहित्य बंध-अनुबंध **प्रा. भाग्यश्री रामचंद्र पाटील** | 107 |
| 29 | शेती आणि शेतकरी विषयक विचारकर्ते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर **कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे** | 114 |
| 30 | डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक योगदान **डॉ. बिचुकले भाग्यश्री श्रीकांत** | 119 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील आक्रमकता **डॉ. बाळासाहेब दत्तात्रय मागाडे** | 123 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार **डॉ. बबन सिद्राम गायकवाड** | 129 |
| 33 | दलित जनजीवन का परिवर्तन करनेवाले महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर **अशोक बाळू पाटील** | 132 |
| 34 | "जल व्यवस्थापनाची दूरदृष्टी असणारे व्यक्तिमत्त्व डॉ बाबासाहेब आंबेडकर " **अशोक प्रगती कांबळे/ जावळे गौतम रामचंद्र** | 137 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविशयक विचार **डॉ.ए.एम.देशमुख** | 143 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर का हिंदी दलित साहित्य पर प्रभाव **प्रा. सुभाष सिताराम धोंगडे** | 146 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) C
ISSN : 2278-9308
September, 2021

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य

प्रा. डॉ. आवारे सी. एस.
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.मो.क्र. 9604943637

## प्रस्तावना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार व आणि दलितांचे कैवारी म्हणून सर्व परिचित आहेत. ग्रामीण समाज आणि शेती संबंधीचे विचार आजही राज्यकर्ते, नियोजनकार आणि शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत. प्राचीन काळात शेतीचा शोध लागला आणि भारतातील सामाजिक जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. याच कृषी व्यवस्थेमुळे स्थिर नागरी व कृषी जीवनाची परंपरा निर्माण झाली. मात्र परकीय हल्ल्यांनी ही प्रगत नागरी संस्कृती उद्ध्वस्त केली गेली. सिंधू संस्कृतीची लूट ही भारतीय कृषी प्रधान संस्कृतीला लागलेली ओहोटी होती. पुढे मुस्लीम राजवटीही शेतीच्या उन्नतीसाठी फारसे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. ब्रिटिश काळात तर शेतकऱ्यांचे खूपच शोषण झाले. रयतवारी पद्धती याच काळात अंमलात आणली गेली. आधुनिक काळात शेतीच्या क्षेत्रात अमूलाग्र बदल झालेले दिसून येतात. इतके होवूनही शेतकऱ्यांचे होणारे शोषण काही थांबलेले नाही.

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत शेतकऱ्यांवर होत असलेल्या शोषणाला व अन्यायाला कुणीही वाचा फोडलेली दिसत नाही. आधुनिक काळातील समाजसुधारकांनी भारतीय समाज व्यवस्था, वर्ण व जात व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास केला. त्यात प्रामुख्याने महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाची, अन्यायाची व शोषणाची दख्खल घेतलेली दिसून येते. या शेतकऱ्यांच्या शोषणाला वर्ण व्यवस्था कशी जबाबदार आहे, याची चिकित्सा करुन शेतकऱ्यांचे मुलभूत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न या महामानवांनी केलेला आहे.

आधुनिक भारताच्या निर्मितीत ज्या महान नेत्यांनी आपले जीवन समर्पित करुन आपल्या कर्तृत्वाने मोलाची भूमिका बजावली आहे, त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. भारताच्या निर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका राष्ट्र निर्मात्याची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्या कार्यातून दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकारण, संविधान निर्मिती, सामाजिक सुधारणा, संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, कामगार कल्याण, कृषी विकास, अर्थ यासारख्या अनेक क्षेत्रात काम दिसून येते. तरीही त्यांचा प्रमुख भर देशाचा आर्थिक विकास हाच होता. स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिश कालखंडात त्यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी इंग्रज सरकारकडे अनेक सुधारणात्मक मागण्या केलेल्या आहेत. देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सामाजिक सुधारणा व कृषी क्षेत्राचा विकास होणे त्यांना अपेक्षित होते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी ग्रामीण विकास, शेतमजूरांचा विकास, कामगारांचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी अनेक उपाय योजना व विविध उपक्रम राबवून राजकीय निर्णय घेण्यास सरकारला भाग पाडले आहे. आपल्या लिखाणातून व भाषणातून आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे काम निरंतरपणे त्यांनी केलेले आहे. स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताक लोकशाहीला आर्थिक विकासाची एक निश्चित दिशा देण्याचे महान काम त्यांनी केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ग्रामीण समाजव्यवस्थेची चांगली जाण होती. तसेच शेतीबद्दल ही त्यांना जाण व भान होते. ग्रामीण भागात विखूरलेला समाज एकसंघ केला तर शेतीचे चित्र बदलेल अशी त्यांची धारण होती. शेतकऱ्यांची आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी देखील कमी होईल असा त्यांना ठाम विश्वास होता. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे,

त्यासाठी शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढविणे व आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही. त्यासाठी पाण्याचे कायमस्वरुपी नियोजन होणे गरजेचे आहे. तसेच शेतीला उद्योग माणून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे.

प्रत्येक शेतकऱ्याला आजही त्याच्या शेत मालाला योग्य भाव मिळत नाही, त्यासाठी त्यास शासना सोबत सततचा संघर्ष करावा लागतो. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतून कमाल जमीन धारणा कायदा, सरकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेती प्रणालीवर आधारीत शेती महामंडळ, राज्यातील नद्या-खोऱ्यांची विभागणी व विकास आणि जलसंवर्धन योजना इत्यादी गोष्टी अंमलात आल्या. यानंतरच शासनाने त्या बद्दलचे कायदे व नियम बनविले, यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पूर्ण योगदान आहे.

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देखील शेतकऱ्यांचे प्रश्न सुटलेले दिसत नाहीत, त्यांच्या मुलभूत प्रश्नाकडे शासन लक्ष देत नसल्याचेच दिसून येते. त्यामुळे शेतकरी आत्महत्त्या, बेरोजगारी, अल्प भूधारण क्षेत्र, पायाभूत सुविधांचा अभाव, जलसिंचन समस्या, पीक प्रारुप व कृषी उत्पादकता या सर्व समस्यांची उकल करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे आहेत आणि या विचारांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**उद्दिष्ट्ये**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील कृषी क्षेत्राविषयीचे विचार अभ्यासणे.
2. देशातील गरिबी व दारिद्र्य संपवून स्वाभिमानी जीवन कसे जगता येईल याचा अभ्यास करणे.
3. भारतातील कृषी मधून प्रत्येक व्यक्तीचा आर्थिक विकास कसा साधता येईल याचा विचार करणे.
4. भारतातील शेतीच्या समस्यांची तीव्रता अभ्यासणे.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक निर्णय माहिती करुन घेणे.

या संशोधनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन, संशोधन पत्रे जर्नल्स, विविध मासिके, पुस्तके, शासकीय प्रकाशने, विविध नियतकालिके, दैनिक वर्तमानपत्रामधील माहिती, सामूहिक व सहकार शेती, पारंपारिक (खोती) पद्धत, सामूहिक शेती, समाजवाद, वाढती लोकसंख्या, कृषी उत्पादक व औद्योगिककरण इत्यादीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान इत्यादीचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन पद्धती**

वर्तमान काळात भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे. आज भारत 135 कोटी लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यात स्वयंपूर्ण झाला आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची 21 व्या शतकात ओळख निर्माण झाली आहे व याची पायाभरणी डॉ. बाबासाहेब यांनी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रात कार्य दिसून येते. या ठिकाणी फक्त कृषी विकासासाठी केलेले योगदान व कार्य माहित करुन घेण्याच्या उद्देशाने संशोधकाने सदर विषयाची निवड केलेली आहे. या शोध निबंधासाठी दुय्यम स्वरुपाची माहिती वापरलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचार प्रणाली आणि त्यांचे विचार शेती उत्पादनासाठी व शेती विषयक समस्या सोडविण्यासाठी फार मोलाची आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार**

भारतातील शेती विषयीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ग्रंथ स्वरुपात उपलब्ध नसले तरी त्यांची भाषणे, संशोधन, चळवळी, वृत्तपत्रे आणि त्यांच्या विचारांच्या आधारे काही मुद्यांच्या स्वरुपात मांडता येतील. त्यांनी प्रथमत: ऑक्टोंबर 1927 साली एफ.जी.एच. ऍन्डरसन यांनी मुंबई कायदे मंडळात अल्पभूधारक मदत विधेयक मांडले. हे विधेयक धरण क्षेत्राचे लहान आकारमान व विखुरलेले धरणक्षेत्रे या दोन समस्यांवर उपाय सुचविणे यासंबंधी होते. या विधेयकावर स्थावर मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण व एकसंघ धारण क्षेत्राची विक्री

वाङ्मय-२१५



हे उपाय सूचविण्यात आले होते. डॉ. आंबेडकरांनी विखुरलेल्या व लहान धारण क्षेत्राच्या समस्येवर सहकारी शेतीचा उपाय सूचविला. त्यामुळे सहकारी शेतकऱ्यांच्या जमिनीवरील मालकी हक्क अबाधीत राहिल.

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यामध्ये खोती पद्धती अस्तित्त्वात होती. त्यामध्ये ठाणे, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यांच्या काही भागात खोती भूधारणा पद्धत चालू होती. या पद्धतीमध्ये शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोतांची नियुक्ती केली होती. गोळा केलेल्या शेतसाऱ्यामधून काही हिस्सा शासनाकडे जमा होत होता. त्यामुळे ही ठराविक रक्कम शासनाकडे जमा केल्यानंतर खोत स्वतःला असलेल्या अधिकाराचा दूरुपयोग करीत आणि शेतकऱ्यांचे शोषण करीत असत यामुळे लहान शेतकरी आणि खोत यांच्यात संघर्ष निर्माण होत असे. डॉ.आंबेडकरांनी या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी 13 एप्रिल 1929 रोजी खोती पद्धत बंद करण्याचे प्रयत्न केले. 17 सप्टेंबर 1937 रोजी मुंबई कायदे मंडळात खोती पद्धती रद्द करण्याविषयीचे विधेयक मांडले. शेतकऱ्यांचे शोषण थांबले पाहिजे, ही मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय हा मुलभूत व महत्त्वाचा संशोधन लेख इ.स. 1938 मध्ये प्रसिद्ध केला. यामध्ये भारतातील जमीन धारणा पद्धती, जमीन धारण क्षेत्राचे आकारमान, कृषी उत्पादकता आणि शेती व त्यांच्या समस्या याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण केले. कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी धारण क्षेत्राचा आकार वाढविणे व तुकडे एकत्रिकरण करणे आवश्यक आहे. भारतातील जमीन धारणा पद्धती केवळ आर्थिकदृष्ट्या विचार करण्याची बाब नसून ती सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. या जमीन धारणा पद्धतीमुळे भारतातील जाती व्यवस्था व वर्ण व्यवस्था मजबुत होण्यास मदत झाली. जमीनदाराकडून भूमिहीन वर्गाचे सामाजिक व आर्थिक शोषण होत आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शासकीय समाजवादाचा एक भाग म्हणून सामुदायिक शेतीचे समर्थन केले. आज शासन गट शेतीचे समर्थन करत आहे. सामुदायिक शेतीमुळे जमीनदार, अल्पभूधारक, कुळ, शेतमजुर, अस्पृश्य व आदिवासी यावर्गाचे शोषण थांबेल. तसेच जातीभेद नष्ट होईल, आणि आर्थिक सामाजिक समता प्रस्थापित होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजवली जाईल. शेती हा शासकीय उद्योग असावा अशी आग्रही मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती आणि जमिनीची वाटणी करताना जातीपातीचा विचार केला जावू नये. त्यामुळे कोणीही भूमिहीन राहणार नाही. शेती उत्पादनातून शासनाला योग्य तो हिस्सा जमा करुन उरलेले उत्पादन जमीन करणाऱ्या गावकऱ्यांना सरकारने ठरवून दिलेल्या संहितेनुसार सर्वांनी वाटून घ्यावे.

**स्वतंत्र मजूर पक्ष व शेतकरी विकासाचा जाहीरनामा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या उत्थानाचे फक्त विचारच मांडले नाहीत तर त्यांना कृतीशील कार्यक्रमाची जोडही दिली आहे. 10 मार्च 1938 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षातर्फे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील असंघटीत शेतकरी व शेतमजूरांचा मुंबईच्या असेम्ब्ली हॉलवर 20 ते 25 हजार शेतकऱ्यांचा मोर्चा काढला होता. या मोर्चाकडून पुढील मागण्या शासनाकडे करण्यात आल्या.

1. शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करणारी परंपरागत तखोत पद्धत बंद केली पाहिजे व शासन व शेतकरी यातील मध्यस्थांचे उच्चाटन केले पाहिजे.
2. शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे सुखी संपन्न जीवन जगण्यासाठी जमिनीची प्रत्यक्ष मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनती प्रमाणे मोबदला मिळाला पाहिजे.
3. जमीन महसूल व शेतसाराची वसूली करण्यापूर्वी शासनाने शेतकऱ्यांच्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्याची सोय करावी.
4. शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या मजुरांच्या किमान मजुरी दराचे कायद्याने संरक्षण करावे.

5. जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती करणे.
6. जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्न प्राप्त झाल्यास शेतसाराची रक्कम माफ करणे.
7. तीन वर्षापेक्षा अधिक काळ शेतजमीन कसणाऱ्या कुळांना कायम कुळ समजण्यात यावे.
8. सावकारी व्यवसायाला कायद्याने बंधने करण्यात यावीत.
9. सर्व खेडे गावांना पशूपालनासाठी व गुरांच्या चारासाठी गावालगत चराई रान राखीव असावीत.
10. लहान सीमांत शेतकऱ्यांची सिंचनाची पाणीपट्टी पन्नास टक्क्यांनी कमी करावी.
11. देशातील सर्व पडीत लागवडी योग्य जमीन उपरी शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करुन देण्यात यावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक कृतीशील तत्त्वचिंतक म्हणून ओळखले जातात. शेतीच्या प्रगतीसाठी बँका सहकारी पतपेढ्या स्थापण्यासाठी मजूर पक्षामार्फत त्यांनी प्रयत्न केले आहेत. शेतजमिनीचे वाढते तुकडीकरण व जमिनीवर अवलंबून राहणाऱ्या लोकसंख्येचे वाढते प्रमाण यातुन दारिद्र, बेकारी व उपासमार समस्या निर्माण होतात. या समस्या सोडविण्यासाठी शेतीला जोड व्यवसाय व शेतीपूरक उद्योग व्यवसायाची सोय करणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते. शेतकरी व शेतमजूर यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष मार्फत काम केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांमध्ये आत्मसन्मानाची जाणीव निर्माण करुन शेतकऱ्यांवरील विविध अन्याय आर्थिक परिस्थिती विशद करुन त्याविरुद्ध लढण्याची दिशा दिली आहे.

**निष्कर्ष**

1. डॉ. आंबेडकरांच्या मते, एका विशिष्ट आकाराची सहकारी शेत जमीन अस्तित्वात आणण्यास लहान शेतकऱ्यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल.
2. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवरील मालकी हक्क अबाधित राहिल.
3. डॉ. आंबेडकरांनी बेरोजगारी, कृषीचे आधुनिकीकरण व कृषीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त भार कमी करण्यासाठी औद्योगिककरणाचा उपाय सुचविला.
4. डॉ. आंबेडकरांच्या सामुदायिक करार शेतीमुळे आर्थिक समानता आणि सामाजिक एकता निर्माण होण्यास मदत होईल व राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

1. शेती, शेतकरी आणि डॉ. बाबासाहेब
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - 1999
3. अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर - इंद्रजित आल्टे
4. शेतकरी - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक - एप्रिल 2017
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - दया पवार

॥विद्या अमृतम् अश्नुते॥

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal, Pachal

# SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMER

## PACHAL-RAYPATAN

**At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704**

First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994

Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified

♦Re-Accredited by NAAC with 'B' Grade ♦ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

Organized

**One Day National Online Conference on**

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar



# CERTIFICATE

This is to certify that, Dr./Prof./Mr./Miss. C. S. Aware of Arts and Science College, Chousala actively participated/presen

paper entitled Dr. Babasaheb Ambedkaranche Jivan Va Karya in National Level Online Conference held on 29/09/2

at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

Asst. Prof. Dr. Ashok D. Patil
Conference Coordinator

Asst. Prof. Sanjay V. Nimbalk
IQAC Coordinator

Dr. Pramod S. Meshram
I/c Principal

20

## "दलित साहित्याचे बदलते वास्तव"

**प्रा.डॉ. आवारे सी.एस.**
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**********

स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. पिढ्यान्‌पिढ्या शिक्षण, लेखन, वाचन व माणूसपणापासून दूर असणाऱ्या शूद्रातिशूद्र, आदिवासी, भटके-विमुक्त आणि महिलांना महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकार्यामुळे शिक्षण घेण्याची संधी मिळाली. भारतीय राज्यघटनेत तशा प्रकारची तरतूद करण्यात आली आणि देशात प्रथमच या माणूसपण हिरावून घेतलेल्या समाजाला शिक्षणामुळे आपल्या अस्तित्त्वाची जाणीव झाली. आपला इतिहास, धर्म, संस्कृती आणि अवतीभोवती घडणाऱ्या घटना परिस्थितीचा नवीन मूल्यांच्या आधारे अन्वयार्थ लावू लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचार, कार्यातून नवशिक्षित तरुण पिढीला प्रथम स्वतंत्रपणे विचार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. आधुनिक शिक्षण, विचार, धर्मग्रंथ, इतिहासाच्या अभ्यासातून त्यास आत्मभान आले आणि या आत्मभानातूनच तो आत्मशोध घेऊ लागला. आपल्या समाजावर शतकानुशतकापासून लादलेली गुलामी, दास्य, बंधने आणि आपल्या वाट्याला आलेले पशूवत जीवन, इतरांना मिळणारी उच्च वागणूक या सर्वांचा तुलनात्मक विचार करु लागले. या तुलनात्मक विचारातूनच त्यांच्या मनात नकार, विद्रोह आणि स्विकाराची भावना निर्माण झाली. यातूनच मराठी साहित्य विश्वास दलित-आंबेडकरी साहित्याचा उदय झाला. अवघ्या काही दशकातच या साहित्याने जे चांगले ते स्विकारले. जे टाकाऊ आहे ते टाकून दिले आणि जे विषमतावादी आहे त्या विरुद्ध विद्रोह पुकारला आणि मराठी साहित्य विश्वात आपला वेगळा असा ठसा उमटवला. जागतिक पातळीवर दलित साहित्याने मराठी साहित्याला पोचवले आहे; हे दलित साहित्याचे मराठी साहित्याला सर्वात मोठे योगदान आहे.

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. या देशात विविध जाती-धर्माचे, भाषांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. आपले विचार व्यक्त करतात. भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान अधिकार व दर्जा दिला आहे. तरी आज भारतीय समाजव्यवस्थेत काही धर्मांध शक्ती समाजात कधी-कधी शुल्लक कारणावरुन धर्म, जात, पंथ, देवाच्या नावाने समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. दिवसेंदिवस समाज आधुनिक समतावादी, मानवतावादी होण्यापेक्षा अधिक जातीवादी-धर्मांध होत आहे. अशा परिस्थितीत समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या धर्मनिरपेक्ष मूल्यांची पेरणी करण्याची गरज आहे आणि आज दलित साहित्यिक, विचारवंत मोठ्या जिद्दीने महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न करत आहेत. मूळात दलित साहित्याची निर्मितीच या महामानवांच्या विचारातून झाली आहे. या साहित्यनिर्मितीचा मुख्य हेतूच या देशात नवसमाज, नवसंस्कृती, धर्मनिरपेक्ष भारत देशाची निर्मिती व्हावी आणि भारतीय माणसाच्या मनातील सर्व विषमता, जळमटे, जात, धर्म, पंथाचा अहंकार नष्ट होऊन एक माणूस निर्माण व्हावा या हेतूने लेखन करत आहे.

दलित जाणिवेतून निर्माण झालेले दलित जीवनविषयक साहित्य म्हणजे दलित साहित्य होय. १९६० नंतर मराठी साहित्यात अनेक नवप्रवाह उदयास आले. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, विज्ञानवादी या प्रवाहाचा उदय झाला. जात, वर्ग, लिंग, परिसर आणि भाषा यांच्या साहित्याला पडलेल्या सीमा नवप्रवाहांनी ओलांडल्या. मध्यमवर्गाच्या बाहेर जाऊन समाजातील सर्व थरातील जीवनाचे त्यांनी वास्तव चित्रण मांडले. उच्चवर्गीय जातींच्या पलीकडे जाऊन अठरापगड जातींची सुखदु:खे मांडली. हे साहित्य गावकुसाबाहेरच्या पालापर्यंत जाऊन पोहचले. या नवप्रवाहांनी विविध जातीसमूहाची बोलीभाषा वापरली. साहित्य हा मानवी जीवनाचा कलात्मक आविष्कार असतो. साहित्याच्या आस्वादातून त्याचे आकलन होत असते. साहित्याचे समाजाशी अतूट नाते आहे. साहित्यनिर्मिती ही एका व्यक्तीची नसून समाजाचीच निर्मिती असते. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले नवपरिवर्तन सर्व घटकांना दिशा देणारे ठरले. पिढ्यान्‌पिढ्यापासून सर्व घटकांपासून वंचित असलेल्या समाजाचा हुंकार साहित्यातून दिसू लागला. नवप्रवाहामागे सामाजिक परिस्थिती होती आणि जीवनाच्या नव्या प्रेरणा होत्या. महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रबोधन परंपरेला मिळालेला हा साहित्यिक प्रतिसाद होता. यातून स्त्रिया, दलित व श्रमिक यांना सामावून घेणारी साहित्यपरंपरा उदयास आली. त्यामागे नवजागृत समाज होता. पिढ्यान्‌पिढ्या दबल्या-दाबल्या गेलेल्या, चिरडल्या गेलेल्या अस्मितेची गर्जना होती. या साहित्यातून समग्र समाजाचा बहुवादी आकृतीबंध निर्माण होऊ लागला.

दलित साहित्य व बदलते वास्तव :—

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने दलित साहित्याला अधिष्ठान लाभले. १९६० नंतर मराठी वाङ्मयात आढळून येणारा एक नवप्रवाह म्हणून दलित साहित्याकडे पाहिले जाते. दलित साहित्य हे गतिशील चळवळीचे प्रतिबिंब असणारे साहित्य आहे. अशा दलित साहित्यांनी माणूस हेच मूल्य मानले. दलित साहित्याचे प्रकृतीवैशिष्ट्य विद्रोह हे आहे. परंतु दलित साहित्यिकांचा विद्रोह विशिष्ट व्यक्तिविरुद्ध वा विशिष्ट जमातीविरुद्ध नाही तर हा विद्रोह व्यवस्थेविरुद्ध, स्वत्व शोधण्यासाठी आहे. दलित साहित्याच्या प्रेरणेविषयी भगवान ठाकूर लिहितात, "चोखोबाचा विद्रोह हा दलित साहित्याचा पहिला हुंकार आहे. चोखोबा, सोयराबाई, कर्ममेळा यांनी दलित जगण्या भोगण्याची वेदना, आक्रोश, आध्यामिक पातळीवर विठोबा नावाच्या न्यायाधिशासमोर मांडला. जातिदु:खाचं गाऱ्हाणं गायिलं, मात्र त्यांची सुनावणी आणि न्याय निकाल त्याकाळी सामाजिक पातळीवर वास्तव रुपात लागलाच नाही. त्यामुळे दलित साहित्याला तेथून प्रारंभ झाला हे म्हणणे बरे असले तरी दलित वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीने खरे नाही. तो एक भूतदयेच्या अंगाने येणारा, एक तोंड दाबलेल्या अवस्थेचा हुंकार होता."[१] दलित साहित्याच्या चळवळीविषयी डॉ. जनार्दन वाघमारे लिहितात, महाराष्ट्रातील दलित साहित्य चळवळीमागे आंबेडकरी प्रेरणा आहेत. 'एक व्यक्ती एक मूल्य' हे तत्त्व आंबेडकरवादाच्या मूळाशी आहे. बाबासाहेबांचे संबंध तत्त्वचिंतन या वादाचे आत्मतत्त्व आहे.[२]

दलित साहित्याच्या आविष्काराला निरनिराळी रुपं देणारा हा दलित साहित्यातील महत्त्वाचा घटक होय. यातूनच स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही मूल्ये लेखनात रुजली गेली. अशा दलित साहित्याच्या निर्मितीमागील भूमिकेविषयी भालचंद्र फडके लिहितात, दलित साहित्याचा भर आहे तो नव्या मूल्याधिष्ठित समाजरचनेवर. त्यासाठी तो अज्ञान, दारिद्रय, पिळवणूक नाकारीत जाईल आणि एक बंदिस्त समाज निर्माण न करता खुला समाज निर्माण करील. या साहित्याला एक सांस्कृतिक परिवर्तन अपेक्षित आहे[३]

आज दलित साहित्यिक मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. कविता, आत्मकथन या प्रांतात अधिक लेखन झालेले आहे. याविषयी दया पवार लिहितात, आज तरी दलित साहित्याचे बलस्थाने कविता आणि आत्मकथने आहेत हे नाकारता येत नाही. अलिकडे 'कोण म्हणतं टक्का दिला' किंवा 'किरवंत' सारखी नाटके हे ही या चळवळीमुळेच उपलब्ध झाली आहेत. दलित साहित्याची चळवळ ही आत्मकथनाच्या आवर्तनातून बाहेर पडून ती कादंबरीसारख्या विस्तृत प्रवाहात परावर्तित होतील तेव्हा दलित साहित्याला निश्चित बळ मिळणार आहे.[४] दलित साहित्यातील आजच्या पिढीतील कवी, लेखक निर्भिडपणे लेखन करुन लागले आहेत. यामागे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आहे हे मान्य करावे लागेल. एकाच विषयाशी निगडीत न राहता विज्ञाननिष्ठा, वंचना, अपमान, बोध हे सूत्र घेऊन दलित जाणीव व्यक्त होऊ शकते.

दलित कवितेचे प्रेरणास्थान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. याविषयी ज्योती लांजेवार लिहितात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तीने आणि आंबेडकर नावाच्या विचाराने नवा दलित घडविला. दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. आंबेडकर आहेत. त्यांनी माणसाला आत्मभानाची जाणीव दिली. यंत्रयुगाने नवा दलित घडविला नाही. यंत्रयुगाने साधने दिली. आंबेडकर विचाराने मात्र आत्मस्थितीची जाणीव दिली.[५] त्यांच्या मुक्तीलढ्याचा आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबंध आहे. दलित कवितेची नवी रुपे नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, त्र्यंबक सपकाळ, ज.वि. पवार, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, दया पवार, अर्जुन डांगळे यांच्या कवितेतून आज जाणवते.

दलित कथेचा विचार करता अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव, बाबुराव बागुल, वामन होवाळ, अर्जुन डांगळे, योगीराज वाघमारे, केशव मेश्राम हे आघाडीचे लेखक कथा समृद्ध करत आहेत. याचबरोबर प्र.ई. सोनकांबळे, लक्ष्मण माने, उत्तम बंडू तुपे, शंकरराव खरात, माधव कोंडविलकर, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण गायकवाड, दादा मोरे, नरेंद्र जाधव यांनी आत्मकथनातून आपले व समाजाचे चित्र मांडले आहे. हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे, मुक्ता सर्वगोड, शांताबाई कांबळे, कुसुम धावडे या स्त्रिया दलित जाणीव व दलित स्त्रियांचे जीवन मांडत आहेत. दलित साहित्य अस्पृश्यता, सांस्कृतिक परंपरा नाकारीत आहेत. भालचंद्र फडके दलित साहित्याविषयी लिहितात, आज दलित साहित्यात दोन स्वर आहेत. एक स्वत:शी संवाद म्हणजे आपल्याला जाणवणाऱ्या वेदनेचा आणि दुसरा स्वेतरांशी संवाद म्हणजे विद्रोहाचा, पहिल्यापेक्षा दुसरा स्वर अधिक तीव्र आहे. विद्रोही साहित्याचे मूल्यमापन रुढ साहित्यविषयक निकषांवर होऊ शकत नाही, कारण या विद्रोही साहित्याने समाजातील अनिष्ठा व्यवस्था, दंभ, ढोंग, प्रतिगामी शक्ती यांच्या विरुद्ध आक्रमक पवित्रा घेतलेला असतो.[६] आपले दाहक अनुभव, जगलेले कटू अनुभव तो मांडू लागला आहे. यातून आहे ते जग नाकारुन ते बदलवून नव्याने मांडण्याकडे त्याचा कल आहे. त्यांचा नकार हा एका नव्या जगाला जन्म देणारा होकार आहे.

फुले-आंबेडकरवादी विचारातून ग्रामीण, दलित, स्त्रीवादी नवप्रवाहांची निर्मिती झाली. यामागे बदललेली सामाजिक परिस्थिती होती. यातून शूद्रातिशूद्र, स्त्री व शेतकरी यांना केंद्र करणारी

साहित्यपरंपरा जन्माला आली. परिवर्तनाच्या चळवळीमुळे दलितांना जे आत्मभान प्राप्त झाले त्याचा परिणाम म्हणून दलित लेखक आपल्या सभोवतीच वास्तव न्याहाळू लागला. दलितांच्या मुक्तीलढ्यांचा आविष्कार साहित्यातून येऊ लागला. दलित साहित्याने परंपरेला नकार दिला, परंतु केवळ वर्णीय प्रश्नात अडकून पडल्याने दलित साहित्यालाही जातीय मर्यादा पडल्या. माणसाला माणूसपण देण्याचे काम दलित साहित्याने केले. तरीही दलित साहित्याने अगदी व्यापकपणे सभोवती बघणे गरजेचे आहे. यातून अजून साहित्याच्या सीमारेषा रुंदावत जातील.

**समारोप**

साहित्यनिर्मिती ही त्याच्या जगण्याशी, त्यामागील जीवनधारणेशी जोडलेली असते. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांनी गरिबांची ससेहोलपट चालविलेली आहे. याला बदलण्याचे काम साहित्य आणि जीवन या दोन्हींवर व्रतस्थ निष्ठ ठेवणारा लेखकच करु शकतो. आज समकालीन वास्तव उग्र व भयानक झाले आहे. माणसाच्या इच्छा व सभोवतालचे वातावरण यामुळे माणूस भयावह बनला आहे. याला नवचेतना देण्याचे काम लेखक करत असतो.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक परिवर्तने घडून आली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा मराठी साहित्यावर आमूलाग्र बदल झाला. शूद्रातिशूद्र, स्त्री व शेतकरी वर्ग शिक्षण घेऊन आपले अस्तित्व सिद्ध करु लागला. अन्याय अत्याचाराला प्रतिकार करु लागला. ते चळवळीतून व साहित्यातून प्रकट होऊ लागले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय खेड्यांचे पारंपरिक स्वरुप बदलत होते. त्या बदलत्या स्वरुपाचा परिणाम ग्रामीण व दलित साहित्य निर्मितीवर होऊ लागला. या प्रवाहांनी मराठी साहित्य समृद्ध बनविले. त्यांच्या साहित्यातून आत्मशोधाचे स्वरुप प्रकट होऊ लागले. नवप्रवाहातील लेखकांनी सजगपणे लेखन केले तर महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजबदलाचे स्वप्न साकार होईल.

**संदर्भ ग्रंथ**

१. सातपुते पोपट (संपा.) -चळवळ आणि साहित्य - श्रीरामपूर २००९ - पृष्ठ १०३.

२. तत्रैव - पृष्ठ ११३-११४.

३. फडके भालचंद्र - दलित साहित्य वेदना व विद्रोह - पुणे २००० - पृष्ठ ७७.

४. लांडे सुमती - वाङ्मयीन चळवळी आणि दृष्टिकोन - श्रीरामपूर २००८ - पृष्ठ २४.

५. लांजेवार ज्योती (लेख) - दलित साहित्य, समकालीन साहित्य-प्रवृत्ती आणि प्रवाह - पृष्ठ २७४

६. उनि, फडके भालचंद्र - पृष्ठ १७६.

**21**

# आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्रामीण संस्कृती : एक चिंतन

**डॉ. मारोती माधवराव घुगे**
मराठी विभाग
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी
जि. जालना

**********

२००५ ते २०२० हा कालखंड ग्रामीण जीवनाच्या स्थित्यंतरांच्या दृष्टिने अतिशय महत्त्वाचा ठरतो आहे. या पंधरा वर्षाच्या काळात खेडे व शेतीचे संदर्भ कमालीचे बदललेले दिसतात. जागतिकीकरणाचे बरे वाईट परिणाम खेड्यावरती होऊन गेलेले आहेत. त्याचा परिणाम म्हणून 'ग्रामीण' या संकल्पनेचा नव्याने विचार करावा अशी परिस्थिती आज काळीपांढरीच्या संदर्भात झालेली दिसते आहे. त्रि. ना. अत्रे यांनी गावगाड्यामध्ये मांडलेली ग्रामव्यवस्था आज मोडकळीस निघालेली दिसते आहे. जुने सर्वच संदर्भ बदलून गेलेले आहेत. नव्या संदर्भांशी ग्रामीण माणसे जुळवून घेताहेत. शेती व खेडे आतंरबाह्य आमूलाग्र बदललेले आहे. आजमितीला शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान पूर्णतः स्थिरावलेले आहे. १९८२ ला आलेल्या 'गोतावळा' व 'पाचोळा' या कादंबऱ्यांनी यांत्रिकीकरणाची चाहूल चित्रित केलेली होती. नुसता ट्रॅक्टर शेतीत आला आणि शेतकऱ्याच्या जीवनात मोठा बदल घडून आला. त्याच्या संपूर्ण जित्राब संस्कृतीवरती गंडातर आल्याच्या पाऊलखुणा आनंद यादवांनी कादंबरीतून चित्रित केल्या होत्या. त्याचप्रमाणे रा. रं. बोराडे व उद्धव शेळके यांनीही गावात टेलरिंग मशिनच्या अनुषंगाने खेड्यातील राजकारण कादंबऱ्यामधून रेखाटले होते. मात्र ग्रामीण कवितेने या परिवर्तनाविषयीचे चित्रण ज्याप्रमाणे करायला हवे होते तवढे समाधानकारक केलेले दिसत नाही. शेतकऱ्याच्या अवतीभोवतीची जित्राब संस्कृती अलीकडे संपल्यात जमा आहे. गावातील सत्तर ते ऐंशी टक्के लोकांकडे शेती कसण्यासाठी बैलंच नाहीत. शेतीमातीचे व खेड्याचे

Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

**December-2021 Volume-12 Issue-28**

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| | | |
|---|---|---|
| 57 | निवडक दलित कवियित्रींच्या कवितांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>ललिता मानसिंग गोपाळ | 187-191 |
| 58 | राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य<br>प्रा. डॉ. आवारे चंद्रसेन सावळाराम | 192-194 |
| 59 | छत्रपती शाहू महाराज एक आदर्श राजा<br>हनुमंत व्यंकटी घाडगे | 195-197 |
| 60 | महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा साहित्यिक अभ्यास.<br>डॉ. रामहरी मधुकर सूर्यवंशी | 198-200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री उन्नती संबंधीची भूमिका<br>प्रा.महेंद्र पद्माकरराव देशपांडे | 201-204 |
| 62 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक धोरण : एक चिंतन<br>डॉ. मिनाक्षी प्रल्हादराव शिंदे | 205-207 |
| 63 | मराठी काव्य आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>डॉ.तुळशीराम उकिरडे | 208-212 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य

प्रा. डॉ. आवारे चंद्रसेन सावळाराम
मराठी विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता. जि. बीड

महाराष्ट्र हे कृषी प्रधान राज्य आहे. सुपीक जमिन, अनेक नद्यांमुळे महाराष्ट्र राज्य शेतीबाबत सुजलाम–सुफलाम झाले आहे. त्याच बरोबर महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची, समाज सुधारक व विचारवंताची भूमी आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, शरद पवार आदी राज्यकर्ते, समाजसुधारक व विचारवंत या भूमीने भारत देशाला दिले आहेत. महाराष्ट्रात बहुजन समाज बहुसंख्येने राहत असणारा, परंतू अतिशय वाईट अवस्था प्राप्त झालेल्या शेतकरी वर्गाविषयी या सर्व विचारवंताना चिंता वाटत होती. शेती आणि शेतीवर उपजिविका करणारा शेतकरी वर्ग त्यांच्या अस्मियतेचा विषय होता. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून येवून त्यांनाही सन्मानाने जगता यायवे, यासाठी वरील सर्व समाज सुधारकांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केलेले दिसून येतात. राज्यपदाचा वापर जनकल्याणासाठी व सर्वसामान्य गोर–गरीब जनतेसाठी करावयाचा असतो. अशा प्रकारचा चांगला आदर्श राजर्षी शाहू महाराजांनी घालून दिला आहे. राजर्षी शाहूंनी राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक अशा सर्वच आघाड्यावर पुरोगामी धोरणे राबविलेली पहावयास मिळतात. कामगार, कष्टकरी, शेतकरी, शुद्रातीशूद्र, स्त्री हा राजर्षी शाहूंच्या चिंतनाचा विषय होता. या सर्वच पिडीत घटकांच्या उध्दारासाठी त्यांनी सतत प्रयत्न केलेले दिसून येतात.

छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानांचे प्रमुख मानले जात होते. शाहू महाराजांचा जन्म कागल येथील घाटगे घराण्यामध्ये 26 जुलै 1874 रोजी झाला. शाहू महाराजांची कारकिर्द अतिशय चांगली आणि उल्लेखनीय स्वरूपाची राहीलेली आहे. कोल्हापूर संस्थानचे चौथे राजे शिवाजी यांचा अहमदनगर येथे इंग्रजांच्या कैदेत असतांना मृत्यू झाला. त्यांना औरसपुत्र नसल्याने त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी कागद येथील घाटगे घराण्यातील जयसिंगराव घाटणे यांचे थोरले अपत्य यशवंततराव यास 17 मार्च 1884 रोजी दत्तक घेण्यात आले. 2 एप्रिल 1894 रोजी शाहु महाराजांनी कोल्हापूर राज्याची अधिकार सुत्रे आपल्या हातात घेतली. आपल्या सत्तेचा वापर त्यांनी लोक कल्याणासाठी केला. याचा परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानात अनेकविध सुधारणा घडून आल्या. यामध्ये सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे महात्मा ज्योतीबा फुले यांच्या नंतर निष्प्राण होत चाललेल्या ब्राम्हणेत्तर चळवळीला त्यांनी नवसंजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीचे ते मार्गदर्शक बनले. समाजातील सामाजिक विषमता दूर करून बहूजन समाजातील लोकांना न्याय मिळवून देणे हे ब्राम्हणेत्तर चळवळीचे उद्दीष्टे होते. शाहू महाराजांच्या प्रेरणेने 1911 मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. एवढेच नव्हे तर त्यांच्याच प्रयत्नाने 1918 मध्ये कोल्हापूर येथे आर्य समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. शाहू महाराजांच्या कार्याविषयी बोलावयाचे झाले तर बहूजन समाजातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी त्यांच्या राहण्याची सोय व्हावी म्हणून वस्तीगृह काढले. त्याच बरोबर गरजूवंत मुलांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण त्यांनी आखले. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. यासाठी त्यांनी मोफत शिक्षण देण्याचा कायदा केला. सामाजिक विषमता व अन्यायाविरूध्द त्यांनी फार मोठा संघर्ष केला. समाजातील जाती–भेद, अस्पृता, सरकारी नोकऱ्यात राखीव जागा मिळाल्या पाहीजेत यासाठी प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर बहुजन समाजातील मुलांना शासकीय नोकऱ्यात 50 टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा शाहू महाराजांनी केला.

**शोध निबंधाची उदिष्ट्यो : –**

1) राजर्षी शाहू महाराजांच्या शेती विषयक कार्याचा अभ्यास करणे.
2) शेतकऱ्यांच्या शिक्षण विषयक धोरणांचा आढावा घेणे.
3) राजर्षी शाहू महाराजांच्या पाणी व्यवस्थापना विषयी जाणून घेणे.
4) शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाची गृहितके : –**

1) राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविषयक अनेक सुधारणा केलेल्या आहेत.
2) शाहू महाराजांनी आदर्श जलव्यवस्थापनाचा उत्तम नमुना सादर केलेला आहे.
3) शेतकऱ्यांच्या विविध समस्या व त्याच्या निवारणासाठी राजर्षी शाहूंनी अथक प्रयत्न केलेले आहे.

**संशोधन पध्दती : –**

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक अभ्यासपध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधनसामग्री म्हणून म्हणून प्रकाशित संदर्भ ग्रंथांचा उपयोग करण्यात आला आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य : –

कोल्हापूरच्या संस्थानच्या इतिहासातच नव्हे तर भारतीय इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य महत्वपूर्ण आहे. याच बरोबर शेती विषयक कार्य ही उल्लेखनीय आहे. ज्यावेळी कोल्हापूरच्या संस्थानाची सुत्रे राजर्षी शाहूंनी हाती घेतली त्यावेळी प्रजेला उद्देशून त्यांनी जो जाहीरनामा काढला, त्यातून त्यांची प्रजेविषयीची तळमळ स्पष्ट होते. 'आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितासंबंधीची एकसारखी अभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानाचा सर्व बाजूंनी विकास व्हावा अशी आमची उत्कट ईच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे आप्तजन, जहागीरदार, सरदार, मानकरी, इनामदार, कर्मानदार, सर्व दर्जाचे सेठ, सावकार व इतर प्रजाजन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हांस आवश्यकता आहे. आज आमचा राज्यकारभार दीर्घ काळापर्यंत टिकून तो सुखद व्हावा म्हणून आम्ही त्या परात्पर जगं चालकांच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करतो.'

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात शेती हा प्रधान व्यवसाय होता पण शेतीचे लहान लहान तुकड्यात विभाजन झाले होते. वाटणी व्यवहारानी अशा लहान तुकड्यांची निर्मिती झाली होती. ती बदलावी आणि त्याचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे हा त्यांचा विचार होता. म्हणजेच शेती किफायतशीर होईल आणि शेतकऱ्यांची प्रगती होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते. ते मत त्यांनी वेळोवेळी बोलून दाखवले होते. माणगावच्या परिषदेमध्ये भाषण करताना ते म्हणाले, "तुम्ही साधारण माणसे दहा एक्कर जमीन वाट्याला येईल, असे तुमच्या मालकीचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्या वडील असणाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या, म्हणजे सर्वांना अर्धपोटी रहावे लागते ते वाचेल." त्यासाठी त्यांनी 1913 ला अविभाज्य इनामाचा कायदा केला. त्यामध्ये वाटणी करता येणार नाही असे ठरले. त्यांनी सर्वांसाठी एक महत्वाचा संदेश दिला. ते म्हणत – 'कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख तर होतेच शिवाय सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषी कर्म करताना क्षात्र धर्माला बाधा येते ही समजूत निखालस खोटी आहे. ज्यावर माणसाची व समाजाची सुव्यवस्था आणि उन्नती अवलंबून आहे, ते कर्म कमीपणाचे आहे ही समजूत वेडगळपणाची आहे. हे असे उभे कर्म करणारा माणुस, समाज खऱ्या अर्थाने क्षत्रिय होय. अन्न माणसाला जगविते, त्याचे पालन पोषण करते तसेच त्याला बलवानही करते आणि इतरांनाही जगवा असा संदेश देते. श्रमाची प्रतिष्ठा जगात फार मोठी आहे. शेती करणे ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे.'

आपल्या कोल्हापूर संस्थानातील शेतकरी हा दारिद्र्या व अज्ञानानी पिचलेला आहे. तो सावकाराच्या ओझ्याखाली दबला आहे. म्हणून शेतकरी सावकारशाहीतून मुक्त झाला पाहिजे. शेतीतील अधिक उत्पन्न वाढीसाठी व शेतकऱ्यांचे दारिद्र्या नष्ट होण्यासाठी शेतीमध्ये सुधारणा करून शेतीस पाणीपुरवठा झाला पाहिजे याची तळमळ त्यांना होती. ती तळमळ त्यांनी कृतीत आणून तत्कालीन शेतकरी, कष्टकरी व कामगार वर्गाला त्यांनी फार मोठा दिलासा दिल्याचे दिसून येते.

1) 1897 सालच्या दुष्काळाची झळ संस्थानाला लागली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी महाराजांनी मोठ्या प्रमाणात कामे काढली, अन्नछत्रे सुरू केली. शेतकरी सावकारी पाशात अडकला होता त्याला कर्जे दिली व त्यांची जमीन सावकाराकडून सोडवून घेतली. शेतकऱ्यांच्या जनावरांची काळजी महाराजांनी घेतली. त्यांना चारा व पाण्याची सोय करून जंगले त्यांना खुली करून दिली. शेतकऱ्यांच्या शेतसाऱ्यात सुट दिली.

2) शेतकरी शेतीमध्ये नियमित घेत असलेल्या पीकापेक्षा वेगळेपणा म्हणून सन 1908 साली महाराजांनी चहाची लागवड केली. तसेच रेशीम मिळविण्यासाठी तुतीच्या लागवडीचा प्रयोग केला. पन्हाळ्याच्या परिसरात कॉफीच्या लागवडीचा प्रयोग त्यांनी यशस्वी केला. तसेच त्यांनी वाखासाठी अंबाडीची लागवड केली. अशा विविध प्रकारच्या नगदी पीकांची उत्पादने घेवून शेतकऱ्यांचे दारिद्र्या कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न महाराजांनी केला. जो प्रयोग आज पुर्ण देशात करण्याचा प्रयत्न होत आहे.

3) सन 1918 साली महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट करण्याचा कायदा केला. जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना वतनदारी, इनामदारी जाचक ठरत होती. कुलकर्णी व इनामदार हे शेतकरी वर्गाची पिळवणूक करत होते. या कायद्यापुरते महाराजांनी कुलकर्ण्याकडील काम काढले व ते त्यांनी तलाठ्याकडे दिले. त्यांनी आता नवीन तलाठी पध्दती सुरू केली. या कायद्यामुळे कुलकर्णी वर्गानी फार मोठे आंदोलन सुरू केले. त्याकाळात निघत असलेल्या जातीनिष्ठ वृत्तपत्रात महाराजांवर मोठ्याप्रमाणात टीका झाली पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट हा कायदा स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही सरकारलाही पसंत पडला. मुंबई सरकारने सन 1950 पासून मुंबई प्रांतात कुलकर्णी वतने नष्ट करण्याचा कायदा केला. त्यामुळे 1 मे 1951 पासून मुंबई प्रांतात कुलकर्णी वतन नष्ट झाले आणि तलाठी पध्दती सुरू झाली. यावरून असे म्हणता येईल की भविष्यकालीन प्रगतीचा अचूक वेध महाराजांना होता. म्हणूनच ते द्रष्टे राजे होते हे स्पष्ट होते.

4) शाहू महाराजांनी महार वतने नष्ट केली. त्यावेळी गुलामाप्रमाणे उपयोग करून घेण्यासाठी ग्रामीण भागात महार वतने प्रचलित होती. या वतनासाठी महारांना जनावरांप्रमाणे वागवले जात असे ते महाराजांनी बंद केले. त्यांच्या जमीनीचा परतावा केल्या. त्यांच्याकडून सक्तीने काम करून घेण्यास महाराजांनी 25 जून 1918 रोजीच्या कायद्याने बंदी केली. त्याचवेळी बलूतेदारी पध्दतीने ही थैमान घातले होते. ती पध्दत बंद करण्याचा कायदा महाराजांनी सन 1919 साली केला. यावरून असे दिसते की, महाराजांनी 'मजूरापासून ते मोठ्या शेतकऱ्यांपर्यंत त्यांना स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला व तो कमालीचा यशस्वी झाला. आता शेतकरी सावकारी पाशातून मुक्त होवून शेतीमध्ये आनंदाने कष्ट करू लागला. अशी पार्श्वभूमी तयार झाल्यानंतर कृषीमध्ये उत्पन्न वाढवायचे असेल तर त्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे हे ओळखून महाराजांनी आपले लक्ष तिकडे लावले.

5) त्यासाठी त्यांनी राधानगरी धरणाचे बांधकाम केले. जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठीच्या योजना आखण्याचे महाराजांच्या विचाराधीन असताना कोल्हापूरच्या पश्चिम दिशेस 1907 साली महाराजांनी योजना आखली. त्यासाठी विचारविनीमय सुरू झाला. जागेची पाहणीकरून

1908 साली पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने या धरणाचे काम सुरू झाले. श्रीमंत बापूसाहेब महाराज यांच्या नियंत्रणाखाली कामास सुरवात झाली. हे धरण बांधताना महाराजांना खूप कष्ट पडले कारण हे धरण बांधत असाताना अनेक मत–मतांतरे झाली पण महाराज हटले नाहीत. त्यांनी चिकाटीने काम सुरू ठेवले. सन 1917 पर्यंत या धरणाचे काम बरेच पूर्ण झाले. त्याला 26 लाख रूपये खर्च झाले होते. यानंतर आर्थिक संकटामुळे महाराज़ांना हे काम बंद ठेवावे लागले. नंतरच्या काळात छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात 1958 साली हे काम पूर्ण झाले.

या धरणामुळे शेतीस मोठ्या प्रमाणात पाणी मिळू लागले. शेतकरी सधन होवू लागला. ऊसाचे क्षेत्र वाढले, पैसा मोठ्या प्रमाणात मिळू लागला. भोगावतीचा काठ हरितक्रांतीचा भाग झाला. त्यातून मोठ्या प्रमाणात विद्युत निर्मिती होवू लागली. कोल्हापूर संस्थानातील अनेक मोठ्या गावांना याच धरणाची वीज आजही पूरविली जात आहे. या धरणातून सांगली, मीरज, इस्लामपूर या भागास वीजपुरवठा होतो. ह्या धरणाचे पाणी नदीकाठच्या खालच्या बाजूस पाटबंधाऱ्यासाठी उपयोगात आणले जात आहे. याशिवाय महाराजांनी पाणीपुरवठ्यासाठी अनेक योजना आखल्या होत्या, त्या आता साकार होत आहेत.

सध्या कोल्हापूरचा शेतकरी समृध्द होत आहे. कारण कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वच लहान मोठ्या नद्यांवर अनेक धरणे बांधली आहेत? चोहोंकडे बागायती शेती दिसत आहे. शेतकरी आनंदी आहे. सारा भारत देश कौतुकाने याकडे पाहात आहे.

शेतकरी सावकारी पाशातून मुक्त करून शेतीला पाणी पुरवठ्याच्या सुविधा झाल्यानंतर शेतीमालाला बाजारपेठ आवश्यक होती. त्याचीही महाराजांनी व्यवस्था केली. ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात येत होते. त्यापासून गुळ तयार होवू लागला म्हणून यापुर्वीच त्यांनी 1895 साली शाहूपूरी व्यापारपेठेची स्थापना केली होती. पुढे त्याचे रूपांतर शाहू मार्केट यार्ड मध्ये झाले. आज मोठ्या प्रमाणात कोल्हापूर जिल्ह्यात व महाराष्ट्रात साखर कारखाने दिसतात. विशेषतः हे कारखाने सहकारी तत्वावर चालत आहेत व ते अत्यंत यशस्वीरित्या वाटचाल करीत आहेत, याची बीजे शाहू महाराजांनी त्याच काळात रूजवलेली होती.

निष्कर्ष :–

1. राजर्षी शाहू महाराजांचे विचार व सामाजिक, शैक्षणिक कार्य अनन्यसाधारण असून शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्वाचे व उपयोगी ठरते.
2. शाहू महाराजांनी भारतीय अर्थ व्यवस्थेत असणारे शेतीचे महत्व शिक्षणाच्या माध्यमातून पटवून दिले. शेती करण्यामागची कमीपणाची भावना व न्यूनगंड दूर करून शेती व्यवसायाला प्राधान्य दिले.
3. प्रयोगशील व आधुनिक शेती संदर्भात अनेक उपाययोजना करून नवनवीन तंत्रज्ञान व प्रयोगामुळे जमिनीच्या प्रतवारीनूसार पीकांची निवड केल्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली.
4. शेतीस बारमाही पाणीपुरवठा व्हावा यासाठी छोटे मोठे तलाव, विहीरी, कालवे यांची निर्मिती करून पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून मोठ्या अशा राधानगरी धरणाची उभारणी केली, परिणामी शेतीच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली.
5. राजर्षी शाहू महाराजांनी शेतीसाठी विविध प्रयोग करून जुन्या अवजारांच्या ठिकाणी नविन अवजारे आणण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यासाठी त्यांना तज्ञांची प्रात्यक्षिके, प्रदर्शने, शेती संस्था असे उपक्रम सुरू करून शेती व्यवसायाला चालना व बळ दिले.
6. शाहू महाराजांना शेतकरी, पद–दलिताबद्दल सहानुभूती होती. बहुजनांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी शिक्षण संस्था, वसतिगृहे काढून ब्राम्हणेत्तर चळवळ आणि अस्पृश्यता निर्मूलन चळवळ एकाचवेळी एकाच तत्वावर सुरू करून समाजात जागृती घडवली.

सारांश : –

भारत देशातील समाज सुधारकांच्या यादीत राजर्षी शाहू महाराजांचे स्थान अग्रस्थानी आढळून येते. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्त्री शिक्षण, अस्पृष्यता, जातीभेद, शेतकरी वर्ग आणि बहूजन वर्ग या सर्वांच्या बाबतीत स्वतःला पूर्णपणे झोकून देवून कार्य केलेले दिसून येते. स्वातंत्र्य, समता, बंधुता तसेच एकात्मता या गोष्टी त्यांनी आपल्या कृतीतून समाजाला दाखवून दिल्या. त्यांनी या देशाला समतेचा संदेश देवून जातीभेद, वर्णभेद, अस्पृष्यता या व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने आणाऱ्या गोष्टी जाणीवपूर्वक नष्ट करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजात खऱ्या अर्थाने लोकशाही मुहूर्तमेठ रोवणारे एक महान समाजसुधारक व जाणता राजा म्हणून त्यांनी तत्कालीन प्रजेत आपली ओळख निर्माण केलेली होती.

संदर्भ ग्रंथ : –

1. डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, 2001.
2. डॉ. रमेश जाधव – लोकराजा शाहू छत्रपती – सुरेश एजन्सी पुणे, 2005
3. डॉ. दा. धो. काचोळे – समाजशास्त्रीय विचारांचा मुलाधार – कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2005.
4. तु. का. नाईक – छत्रपती राजर्षी शाहू महाराज – मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे.
5. माधवराव बागल – बहूजन समाजाचे शिल्पकार
6. धनंजय कीर – प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती – व्याख्याने, 1970.

SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 35. | भास्कर ढोके | बकऱ्याची बॉडी - समकालाचे भान असलेली कथा | 148 |
| 36. | डॉ. रमेश अर्जुन शिंदे | जागतिकीकरणातील अस्वस्थ वर्तमानाच्या कथा : ब्लॉगच्या आरशापल्याड | 154 |
| 37. | श्री. राहुल देवीदासराव फाटकर | बाबाराव मुसळे यांच्या कथेतील स्त्रीजीवन | 159 |
| 38. | सूर्यकांत श्रीधर आदलिंगे | जयंत पवार यांचा कथासंग्रह : वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा | 163 |
| 39. | डॉ. एम. ए. कव्हळे | जागतिकीकरणाचे वास्तव चित्रण करणारी कथा : ब्रँड फॅक्टरी | 167 |
| 40. | डॉ. कैलास इंगळे | टंचाई - उद्ध्वस्त ग्रामसंस्कृतीचा आलेख | 172 |
| 41. | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | आसाराम लोमटे यांच्या कथेतील 'आलोका'तील लोक | 175 |
| 42. | प्रा. डॉ. तुळशीराम उकिरडे | 'फुलवा' कथा संग्रहातील स्त्री वेदना | 179 |
| 43. | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर | समकालीन जीवनातील नात्याचा वेध घेणारी कथा : मोराची बायको | 184 |
| 44. | ललिता मानसिंग गोपाळ | राजन खान यांच्या 'बाईजात' कथासंग्रहातील स्त्रीजीवन | 187 |
| 45. | प्रा. शरद बोराडे | बदलत्या ग्राम वास्तवतेचा 'दाखला' | 190 |
| 46. | प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | 'एका सुगीची अखेर' मधील कैलास दौंड यांची कथा : एक दृष्टिक्षेप | 193 |
| 47. | प्रा. डॉ. यशवंत हाके | ग्रामीण जीवनानुभवांचा संवेदनशील आविष्कार : पोशिंदा | 196 |
| 48. | डॉ. प्रशांत गुणवंतराव चौधरी | कलात्मकता आणि सामाजिकतेचा सुरेख संगम : रस्ता आणि इतर कथा | 201 |
| 49. | प्रोफेसर डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | मधुकर क्षीरसागर यांच्या कथांचे स्वरूप | 204 |
| 50. | डॉ. सी. एस. आवारे | स्त्रीवादी कथेमागील भूमिका | 207 |

(Special Issue No.105) ISSN 2349-638x Impact Factor 7.149

# स्त्रीवादी कथेमागील भूमिका

**डॉ. सी. एस. आवारे**
मराठी विभागप्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, ता. जि. बीड

साहित्य, मग ते कुठलेही असो, समाज जीवनाचे ते मुख्य अंग असते. साहित्यामध्ये समाजाचे, त्या समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब पडत असते. म्हणूनच जशी संस्कृती तसे साहित्य असे आपण म्हणत असतो. मानवाच्या संस्कृती बरोबरच साहित्याचे स्वरूपही अंतर्बाह्य सतत बदलत असते. त्यामुळेच असे म्हणावे लागते की, समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य हे साहित्यामध्ये असते, साहित्यातील विचारामध्ये असते. साहित्यातील विचार आणि साहित्यिक यांचा संबंध अगदी परस्परपूरक असतो. म्हणजेच साहित्यिक आणि साहित्याची परंपरा यांचा संबंध जन्मापासून ते शेवटपर्यंत असतो. त्यांचे नाते अगदी अतूट असते. साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वात सामाजिक बांधिलकीचा अंश भिनलेला असतो. कारण साहित्यिक जी भाषा वापरतो, ती त्याने तो वापरत असलेल्या समाजातून आत्मसात केलेली असते. आपल्या साहित्य कृतीतून तो जे आविष्कृत करतो, ते त्याला आलेल्या समाजातील अनुभवाचे एक स्वरूप असते.

मराठी साहित्यामध्ये प्रामुख्याने १९५० नंतर काही प्रमुख साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, प्रादेशिक साहित्य इत्यादी साहित्य प्रवाहांचा उल्लेख करता येईल. आता अलिकडे मुस्लीम-मराठी साहित्य, आदिवासी साहित्य असे विविध साहित्य प्रवाहही मराठीमध्ये रुढ होत आहेत. हे प्रवाह निर्माण होण्यामागे काही कारणे आहेत, त्या प्रवाहाची अशी एक भूमिका आहे. त्या भूमिकेनुसारच हे प्रवाह सध्या पुढे वाटचाल करीत असलेले दिसून येतात.

**स्त्रीवाद म्हणजे काय ?**

स्त्रीवाद - स्त्रीवाद समजून घेण्यासाठी स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान समजून घेणे महत्त्वाचे आहे. स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्यापेक्षा तिच्याकडे 'बाई' म्हणून पाहीले जाते. म्हणूनच पाश्चात्य लेखिका सिमॉन द बोव्हा म्हणते, 'बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही नंतर तिला 'बाई' बनविले जात !' बहुसंख्य माता आपल्या या मुलां-मुलीत भेद करीत असतात, त्यांना वंशाचा दिवा म्हणून आपल्याला मुलगाच हवा असे वाटत असते. त्या जाणीवपूर्वक आपल्या कन्येला आदर्श गृहिणी होण्याचे धडे देत असतात. स्वयंपाक कसा करावा, कसे नटावे-सजावे, कसे हसावे-बोलावे, कसे उठावे-झोपावे, सासरच्या माणसांची मर्जी कशी राखावी, याचे उठता-बसता डोस आपल्या मुलींना पाजले जातात. मुलींवर कमनीय दिसण्याच्या सुंदर दिसण्याच्या कल्पना लादल्या जातात. सुंदर दिसणे, आई होणे, प्रियेसी होणे या स्त्री भावांचे उदात्तीकरण केले जात असते. स्त्री ही कोणाची तरी पत्नी, प्रियेसी, बहीण किंवा आई असते, अशीच तिच्या व्यक्तिमत्वाची ओळख प्रारंभीपासूनच करून दिली जात असल्याचे दिसून येते.

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिला आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा अर्थ कळणे. तिला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, तिला तिचे हक्क व अधिकार कळणे, तिला तिच्या अवमूल्यनाची व शोषणाची जाणीव होणे. तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रणव होणे म्हणजेच स्त्रीवाद होय. स्त्रीने 'बाईपणाची' कात टाकून 'माणूसपणाचे' नवे रूप धारण करणे म्हणजेच स्त्रीवाद होय, स्त्रीला तिच्या गुलामीची जाणीव होणे आणि तिने आपल्या गुलामगिरी विरुद्ध बंड करणे म्हणजेच स्त्रीवाद होय. स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या इतिहासातील एक नवा आशय, एक नवा विचार, एक नवी दृष्टी, एक नवे स्वप्न, एक नवी दिशा होय. स्त्रीवादाने जेव्हा संपूर्ण विश्व व्यापेल तेव्हा या विश्वाचा चेहरा मोहरा बदलून-गेलेला दिसेल.

काही वर्षापूवी ज्योती म्हापसेकर यांनी 'मुलगी झाली हो' हे नाटक लिहिले आणि या नाटकाचे असंख्य प्रयोग झाले. या नाटकाने स्त्रीवादाला पुष्टी आणि दृष्टी दिली. या नाटकाने महाराष्ट्रातल्या स्त्री चळवळीला गती दिल्याचे दिसून येते. पुरूषी वर्चस्वाला चोहोबाजूंनी हादरे देणे हे स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्य आहे. आजपर्यंत स्त्री आणि पुरुषाचे मन हे एकाच प्रकारचे असते

असे गृहीत धरले जायचे. त्यामुळे पुरूष लेखकांनी स्त्रियांचे अनुभव कल्पनेने मांडलेले दिसतात. त्यामध्ये स्त्रीवाद व्यक्त झालेला दिसत नाही. पुरूषाला स्त्रीचे विशेष अनुभव मांडता येणार नाहीत, अशी स्त्रीवादाची भूमिका आहे.

दलित साहित्य केवळ जन्माने दलित असणारी व्यक्तीच लिहू शकते. कारण दलितेत्तर लेखकाला जाती विशिष्ठ अनुभव कल्पनेने मांडता येणार नाही, अशी दलित लेखकांची भूमिका आहे. दलितांचा जाती विशिष्ठ अनुभव असो, की निग्रोचा वंश विशिष्ठ अनुभव असो की, स्त्रियांचा शरीरनिष्ठ अनुभव असो, या अनुभवाला प्रत्यक्ष जगण्याचा आधार आहे. त्यामुळे हे अनुभव कल्पनेने जशाच्या तसे अनुभवता येणार नाहीत. स्त्रियांचे ऋतु प्राप्तीचे अनुभव, तिची गर्भधारणा, तिचे मातृत्व हे अनुभव पुरुषाला कधीच अनुभवता येणार नाहीत. स्त्रीचा देहनिष्ठ अनुभव हा तिचा स्वत:चा आहे. स्त्रीचे शरीर आणि मन पुरुषापेक्षा वेगळे आणि भिन्न आहे. त्यामुळे तिचे अनुभव वेगळे असणारच आहेत. या अनुभवांची अभिव्यक्तीही वेगळीच असणार आहे. अशा अनुभवांची समीक्षा देखील वेगळीच असणार आहे.

हजारो वर्षापासून स्त्री ही पुरूषप्रधान व्यवस्थेत जगत आली आहे. तिच्यावर पुरूषसत्ताक मूल्यांचा प्रभाव आहे. तिचे बुद्धी व मन पुरूष शरण बनलेले दिसते. त्यामुळे एखादी कलाकृती स्त्रीने वाचणे किंवा तीच कलाकृती स्त्रीने म्हणून वाचणे यात तफावत आढळते. स्त्रीची वाढ आणि तिचा विकास पुरुषप्रधान व्यवस्थेत झालेला असल्याने तिला तिच्या स्वत्वाचा विसर पडलेला आहे, याची जाणीव स्त्रीला स्त्रीवादी साहित्यातून मिळते. सावित्राबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्यापासून ते छाया दातार, विद्या बाळपर्यंत त्यांच्या साहित्यातून काही स्त्रीवादाची अनेक वैशिष्ट्ये स्पष्ट होताना दिसून येतात.

स्त्रीवादी साहित्य समजून घेत असताना 'स्त्री', 'स्त्री-प्राधान्य' व 'स्त्रीवादी' या शब्दाचे अर्थ नीटपणे समजून घेणे आवश्यक आहे.

(अ) स्त्री-(female)-केवळ स्त्रियांनी केलेले लेखन

(आ) स्त्री प्राधान्य-(Feminine)- पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेविरूद्ध राजकीय भूमिका न घेता स्त्रियांनी केलेले लेखन

(इ) स्त्रीवादी (Feminist)- पुरूषसत्ताक समाज व्यवस्था आणि विचार प्रणाली विरूद्ध राजकीय भूमिकेतून केलेलं लेखन.

पुरुषांनी स्त्री-भूमिकेतून केलेले लेखन केवळ काल्पनिक, अवास्तव आणि अतिरंजित स्वरुपाचे असते. म्हणून स्त्रीवाद्यांनी पुरूषांच्या लेखनाला टाळले आहे. स्त्रीला स्वत:चे अनुभव लिहिल्याशिवाय ख-या स्त्रिची प्रतिमा समाजासमोर येणार नाही, अशी त्यांची भूमिका आहे. या भूमिकेतून स्त्रीवादी समीक्षकांनी जुन्या वाङमयाचे ही नव्याने पुर्नमुल्यांकन केलेले आढळते. एलेन रोबाल्टर या लेखिकेने 'ए लिटरेचर ऑफ देअर ओन' या आपल्या ग्रंथामध्ये 'एमिली ब्रांटे' ते 'डोरिस लेसिंग' पर्यंतच्या ब्रिटीश लेखिकांचा व त्यांच्या लेखनाची चिकित्सा करून त्यामध्ये प्रकट होणारी पुरूषसत्ताक विरोधी आणि स्त्रीवादी भूमिका यांचे विवेचन केलेले आहे.

**स्त्रीवादी साहित्याची भूमिका** - समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि स्वातंत्र्य हा स्त्रीवादाचा गाभा आहे. स्त्रीवादाने स्त्री-पुरूष अशा भेदभावाला कठोर विरोध केलेला आहे. पुरूषाच्या बरोबरीने स्त्रीला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समान दर्जाने वागविले पाहीजे. तिला रोजगाराच्या संधी मिळाल्या पाहीजेत, केवळ स्त्री म्हणून डावलले जावू नये, टेलिफोन ऑपरेटर, रिसेप्शनिस्ट, नर्स, असिस्टंट, स्टेनो आणि सेक्रेटरी अशा कामांसाठीच स्त्रियांची निवड केली जाते. स्त्रीला अधिकाराच्या जागा मिळाल्या पाहीजेत. तिला समान वेतन मिळाले पाहीजे. स्त्रीला संधी मिळाली तर ती आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकते. म्हणूनच व्हर्जिनिया वुल्फ म्हणते, 'तुम्ही लिहा. तुमच्या देहाचा आवाज इतरांना ऐकू गेला पाहीजे, तरच तुमच्या अबोध मनाचा प्रचंड खजिना खूला होवून सर्वांना दिपवून टाकेल !

सन १९७० नंतर पाश्चात्य देशामध्ये स्त्रीवादी साहित्याचा विविध अंगानी अभ्यास सुरू झालेला दिसून येतो. मराठीमध्ये काही अभ्यासकांनी विद्यापीठीय पदव्या मिळविण्यासाठी स्त्रीवादी साहित्याविषयी संशोधन केलेले दिसते. अमेरीकेत जितक्या विपूल आणि समग्रपणे स्त्रीवादी लेखन झालेले आहे, तितके मराठीमध्ये झालेले आढळत नाही. मुळातच पाश्चिमात्य स्त्रीला आपल्या हक्कासाठी खूप लढे द्यावे लागलेले आहेत. मतांचा अधिकार मिळावा, मालमत्तेत वारसा हक्क मिळावा म्हणून तिथल्या स्त्रियांनी चळवळी केलेल्या आहेत. आपल्याकडे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय घटनेने सर्वांना कायद्यापुढे समान लेखले आणि 'एक माणूस- एक मूल्य' असे तत्व घोषित केलेले आहे.

भारतीय स्त्रीच्या लेखनात स्त्रीवादी प्रेरणा प्रकर्षाने व्यक्त झालेल्या आढळत नाहीत. डॉ. मंगल वरखेडे यांनी मराठी कथा लेखिकांचा कथांचा स्त्रीवादी दृष्टीने अभ्यास केलेला आहे. त्यांनी आपल्या ग्रंथात पुढील उतारा दिलेला आहे. 'स्त्री ही घेणारी, पुरूष हा देणारा, हा एक प्रकारचा विशेषण असून त्यातसून सुटका करून घेण्यासाठी स्त्रीने सुरवात केली पाहिजे. त्याचा प्रारंभ पुरूषांच्या 'मी', 'माझे' या भावनेला विरोध केला पाहीजे. एवढेच नव्हे तर आपल्या लैंगिक अनुभवाबद्दल लिहून-बोलून या बाबतीतील स्त्रियांचा दृष्टीकोन किती महत्त्वाचा आहे. हे सर्व जगाला पटवून दिले पाहीजे, अशी भूमिका स्त्रीवादी दृष्टीकोनातून घेतली आहे.'

या संदर्भात हेलन सिक्सू हीने या दृष्टीने काही पथदर्शक उपाय सुचविले आहेत.

१) 'स्त्रीनं फक्त ऐकावे, बोलू नये' या संप्रदायात सामील न होता तिने प्रथम बोलले पाहीजे.
२) 'स्त्री घेणारी आहे, पुरूष देणारा आहे' या कृतीला स्त्रीने नकार दिला पाहीजे.
३) पुरूषकेंद्री भाषिक व्याकरण नाकारले पाहीजे.

साहित्यात लिंगभेद महत्त्वाचा नाही, असे म्हणणारी स्त्री- लेखिका स्त्री म्हणून लिहीत नाही तर लेखक म्हणून लिहिते. साहजिकच तिच्या लेखनाची संहिता ही स्त्रीची संहिताबनत नाही. तिने मानलेले स्त्रीपण हे अशा ठिकाणी तिचे नसते. पुरूषकेंद्री संस्कृतीने तिला आत्मसात करायला लावलेले, लादलेले स्त्रीपण असते. इतकी की तिची नेणीव ही पुरूषकेंद्री नेणीव असते. ती स्त्रीकेंद्री बनली तरच स्त्रीत्वाची संहिता तयार होईल. तसे झाले तर स्त्रीच्या अनुभव विश्वामुळे समृद्ध झालेले वाङमय भांडार स्त्रियांच्या पदरात सत्ता-सामर्थ टाकल्याशिवाय राहणार नाही, अशी आधुनिक स्त्रीवाद्यांची भूमिका आहे.

शांताबाई किर्लोस्कर यांनी 'स्त्री' या मासिकातून सिमान द बोव्हा यांच्या 'सेकंड सेक्स' या पुस्तकाचा सार रूपाने अनुवाद केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील स्त्री विचाराला चालना मिळाल्याचे दिसून येते. ती या संदर्भात म्हणते, 'स्त्रीलिंगी अपत्य जन्माला आले की, त्याला 'बाईपणा'च्या चौकटीत बसविले जाते. तिला बाई बनविण्याची कामगिरी समाजव्यवस्था करीत असते.' 'A women is not Born. She is made a woman.' तर समाजच स्त्रीला स्त्री घडविण्याचेच जोमाने प्रयत्न केले जातात. थोडक्यात स्त्रीच्या माणूसपणाला स्त्री-वादात महत्व असून स्त्रीने माणूस म्हणून जीवन जगावे व समाज व्यवस्थेने तिच्याकडे 'बाई' म्हणून पाहण्यापेक्षा 'माणूस' म्हणून पाहणे याला स्त्रीवाद खूप महत्व देतो. समाजाच्या या कृतीचा समाचार अत्यंत परखडपणे सिमानद बोव्हा या फ्रेंच लेखिकेने आपल्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकात घेतलेला दिसून येतो.

स्त्री म्हणजे देवता, माता, पत्नी, दासी, कामिनी, अबला, नाजूका, लाजरी, भित्री, निसर्गतः च दुबळी, पुरूषावर अवलंबून असलेली अशी काही विशषणे, अशा कितीतरी प्रतिमा स्त्रिला दिल्या जातात. समाजव्यवस्थेने पुरूषांनी आरोपीत केलेल्या या संकल्पना स्त्रीवादी मान्य करीत नाहीत. कारण त्या मागे पुरूषी स्वार्थ आहे, असे त्यांचे मत आहे. उलट स्त्रीने या संकल्पनेतून बाहेर यावे, पुरूषांनी निर्माण केलेल्या या वर्तुळातून स्त्रीने बाहेर पडावे व माणूस म्हणून जगावे, याला स्त्रीवादी विचारसरणीत महत्व आहे. स्त्रीवादात स्त्रीचे माणूसपणा मनुष्यत्व विचारात घेतले जाते. तसेच तिच्या स्वातंत्र्यालाही महत्व दिले जाते. आयुष्यातील निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला असणे, शिक्षणाची संधी असणे, पुरूषा इतकेच अधिकार असणे, पुरूषांच्या विकासा इतकीच स्त्रीला ही विकासाची संधी समाज व्यवस्थेने दिली पाहीजे असे स्त्री वाद्यांना वाटते. साधारणतः १९६० पासून स्त्रीवादाचा जोरदार पुरस्कार जगातल्या प्रगत देशात केला जात असल्याचे चित्र पहावयास मिळते.

शांताबाई किर्लोस्कर यांचे 'स्त्री' मासिक, 'बायजा' आणि 'मिळून साऱ्या जणी' अशा काही नियतकालिकां मधून स्त्रियांच्या प्रखर जाणिवांचा अविष्कार होऊ लागला आहे. गीता साने, तारा भवाळकर यांनी मराठी भाषेत स्त्रियांच्या समानते संदर्भात मौलिक लेखन केलेले आढळते. विभावरी शिरुरकर ते मलिका अमरशेख यांच्यापर्यंत मराठी लेखिकांनी आपल्या लेखनामध्ये स्त्रियांच्या विविध रूपांचा शोध घेतलेला दिसून येतो. अश्विनी धोंगडे यांनी स्त्रीवादाविषयी 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन' असा ग्रंथ लिहीला आहे. सीमा साखरे, नीलम गो-हे, रझिया पटेल, सौदामिनी राव, कुमूद पावडे यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर वेळोवेळी संघर्षाची भूमिका घेतलेली आढळून येते. मेघना पेठे यांनी आपल्या 'हंस अकेला' या कथासंग्रहातून सामाजिक स्त्री प्रश्नांना वाचा फोडलेली दिसून येते. त्यांच्या प्रत्येक कथेतून स्त्रियांच्या मानसिक, शारीरिक, भावनिक घटनांची पिळवणूक कशी होते हेच उलगडून सांगितले आहे. याशिवाय शैला राजे, शांकुतला गोगटे, स्नेहलता दसनूरकर, गौरी देशपांडे, सानिया,